Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 74 – 79
DOI: 10.5281/zenodo.10072513

Original Research Article

# महात्मा गांधी व दांडी यात्रा

प्रा. डॉ. सुरेश कातळे

इतिहास विभाग, शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी ता. औसा जिल्हा: लातूर ४१३६१६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sureshkatale1@gmail.com

Received: 09 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

**सत्याग्रह**

अन्यायाविरूद्ध शांतवृत्ती आणि दृढनिश्चय यांव्दारे प्रतिकार करण्याचा एक अभिनव मार्ग होय. सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह होय. ही संकल्पना पूर्णतः महात्मा गांधींची देणगी असून तिचा उद्घोष व उपयोग त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात केला. प्राचीन भारतीय वाङ्मयात, विशेषतः पौराणिक कथा-आख्यायिकांतून सत्याग्रहाची काही उदाहरणे आढळतात तसेच त्यात सत्यवत, सत्यनिष्ठा, सत्यवन्त, सत्यसंघ वगैरेंचा उल्लेख येतो परंतु सत्याग्रह या शब्दाचा अर्थ त्याहून व्यापक आहे. प्राचीन काळी आत्मक्लेशाचा मार्ग अनुसरून प्रल्हाद व राजा हरिश्चंद्र यांनी अन्यायाविरूद्ध सविनय प्रतिकार केलेला दिसतो. ऐतिहासिक काळात गौतम बुद्ध व महावीर यांनी अहिंसेची शिकवण दिली आणि सत्याग्रहाची दिशा दर्शविली. येशू क्रिस्ताच्या जीवनात सत्याग्रहाचे तत्त्व अधिक प्रगल्भ व सुस्पष्ट झालेले दिसते. त्याने व सॉक्रेटिसने सत्यासाठी आत्मबलिदान केले. साधुसंतांनीही अन्यायाचा प्रतिकार शांतपणे व प्रेमभावनेने केला. साधुसंतांनी आपल्या जीवनात सत्याग्रह ही व्यक्तिगत धार्मिक प्रवृत्ती मानून तिचा अंगीकार केला. राजकीय, सामाजिक, आर्थिक आदी क्षेत्रांतील अन्यायावर मात करण्यासाठी सत्याग्रहाचा वापर करण्यात आलामहात्मा गांधींनी अनुसरलेली सत्याग्रह ही एक वृत्ती आहे. तिचा उगम राग, लोभ, अनुराग, माया, प्रीती आदी कौटुंबिक भावनांत दिसतो. आपलेपणा, आदर, प्रेम, औदार्य हे कौटुंबिक जीवनाचे आधारस्तंभ असून प्रेम अथवा माया यांचे साफल्य कृतींतून व्यक्त होते. ज्यांच्याविषयी आदराची व प्रेमाची भावना असते त्यांची सेवा करणे, त्यांच्यासाठी त्याग करून आत्मसमर्पण करणे, यातच प्रेमाची सफलता आहे. आदर्श कौटुंबिक जीवनात अनुस्यूत असलेली तत्त्वे मनुष्याच्या सर्व व्यवहारांत कृतीत आणणे, ही खरी सत्याग्रहाची जीवन प्रवृत्ती होय. म. गांधीजींनी कौटुंबिक जीवनातूनच सत्याग्रहाचा धडा घेतला आणि जीवनातील सर्व समस्यांसाठी सत्याग्रहाचा उपयोग केला. त्यांना ही संकल्पना कशी सुचली, याविषयी त्यांनी माझे सत्याचे प्रयोग या आत्मचरित्रात लिहिले आहे. म. गांधीजींच्या मनात बालपणीच अपकाराविरूद्ध उपकार करणे, हे शामलभटांच्या

गुजराती कवितेतील वचन ठसले होते. ते म्हणतात, 'मी माझ्या पत्नीकडून अहिंसेचा (सत्याग्रहाचा) मार्ग शिकलो. अहिंसेच्या बाबतीत ती माझी गुरू बनली आणि तिने स्वतःच्या बाबतीत अनाहुतपणे उपयोगात आणलेल्या सत्याग्रहाच्या नियमांचा विस्तारच काय तो मी दक्षिण आफ्रिकेत केला'. पुढे बायबल व भगवद्‌गीता यांच्या वाचनाने त्यांच्या विचाराला दृढपणा आला. टॉलस्टॉयच्या 'तुमच्या अन्तःकरणात ईश्वरी साम्राज्य वसत आहे' या विधानाने त्यास निश्चित दिशा मिळाली.म. गांधी द. आफ्रिकेतील चळवळीला 'निःशस्त्र प्रतिकार म्हणतात भारतात आल्यानंतर त्यांनी या शब्दाला समर्पक नाव सुचविण्याविषयी इंडियन ओपिनियन या नियतकालिकातून जाहीर आवाहन केले, तेव्हा अनेक नावे सुचविण्यात आली पण ती त्यांना पसंत नव्हती. त्याच वेळी मगनलाल गांधींनी 'सदाग्रह' हे नाव सूचित केले. महात्माजींनी त्यात किरकोळ फेरफार करून निःशस्त्र प्रतिकाराला चपखल असे 'सत्याग्रह' हे नाव निश्चित केले. सत्यामध्ये शांतीचा अंतर्भाव होतो. कोणत्याही गोष्टीचा आग्रह धरला म्हणजे बल प्राप्त होते. सत्याग्रह म्हणजे शांतिमार्गाने बलप्राप्तीचा उपाय, साधन किंवा मार्ग होय. महात्मा गांधींनी राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत अहिंसेचा आणि सत्याचा सिद्धांत हिरिरीने व निष्ठेने आणला. त्यांनी अहिंसक सत्याग्रहाला सामाजिक शक्तीचे रूप देऊन स्वातंत्र्य व स्वतःचे हक्क यांसाठी लढ्याचे एक प्रभावी हत्यार निर्माण केले. त्यांनी सत्याग्रहाला तात्त्विक भूमिकेचे अधिष्ठान दिले असून त्याचे संपूर्ण शास्त्र बनविले आहे. केवळ निःशस्त्र प्रतिकार म्हणजे सत्याग्रह नव्हे. सत्याग्रह हे एक जीवन दर्शन आहे. ती एक मूलगामी व सर्वंकष निष्ठा आहे. मनुष्याची सत्प्रवृत्ती व समंजसपणा यांवरील विश्वास हा सत्याग्रहाचा मूलाधार आहे. शुद्ध साध्याकरिता शुद्ध साधनेच उपयुक्त ठरतात शुद्ध साध्याकरिता अशुद्ध साधने उपयोगात आणल्यास साध्यही अशुद्ध बनते आणि साध्य दूर जाते. म्हणून सत्याग्रह हेच शुद्ध साधन होय. सत्याग्रह म्हणजे सत्याकरिता अहिंसेच्या मार्गाने असत्याचा प्रतिकार करणे होय.ज्या व्यक्तींच्या ठिकाणी नैतिक दृष्टया अयोग्य परिस्थितीवर मात करण्याची शक्ती असते, तेच सत्याग्रहाचे खरे अधिकारी होत. त्यांची सहन करण्याची शक्ती हा आत्मशक्तीचा एक भाग आहे. कित्येक वेळा अन्याय सहन करून प्रतिकार करणारा प्रतिपक्षावर जबरदस्तीही करू शकतो. त्याचा आग्रह अविवेकी असू शकतो. त्याची सत्याची कल्पना चुकीचीही असू शकते. त्यात असत्यही भरलेले असण्याची शक्यता असते. म्हणून खऱ्या सत्याग्रहीला नैतिक दृष्टया योग्य काय व अयोग्य काय, हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी पतकरावी लागते आणि आपल्या प्रतिकाराच्या उद्देशात असत्य दिसल्यास माघार घेण्याची तयारीही असावी लागते. माघार घेण्यासाठी सुद्धा धैर्य लागते. निःशस्त्र प्रतिकारसुद्धा हिंसात्मक म्हणजे जबरदस्ती करणारा असतो. त्यात अत्याचारही असतो. सत्य हे तत्त्वतः शत्रूलाही मान्य असावे लागते कारण विवेकबुद्धीची देणगी मानवाला प्राप्त झालेली आहे. शिवाय सत्याग्रहाला मर्यादा नाहीत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील गांधीजींच्या सामुदायिक सविनय कायदेभंगाच्या सत्याग्रहाच्या सामर्थ्यातून हे दिसून येते.म. गांधीजींच्या सत्याग्रही जीवनदृष्टीला 'अध्यात्मनिष्ठ व्यक्तिवाद' असे अत्यंत समर्पक नाव काही विव्दानांनी दिले आहे कारण या विचारप्रणालीत व्यक्तीची अंतःप्रेरणा, तिचे नैतिक सामर्थ्य, निर्माणक्षमता आणि व्यक्तीचे हृदयपरिवर्तन यांना विशेष प्राधान्य असते. गांधीजींची ही संकल्पना वैश्विक स्तरावर लोकप्रिय झाली असून सर्वमान्य झाली आहे. तिचे अनुकरण मार्टिन ल्यूथर किंग, केनेथ कौंडा वगैरे भारतेतर देशांतील नेत्यांनी केले आहे. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे साररूप त्यात आढळते.

१९१७ मध्ये त्यांनी चंपारण येथील शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आंदोलन केले. पुढे १९२०-२२ मध्ये अहिंसक असहकार आंदोलन, १९३०-३२ दरम्यान दांडी येथील मीठाचा सत्याग्रह आणि सविनय कायदेभंग, १९४०-४२ दरम्यान व्यक्तिगत सत्याग्रह आणि १९४२ चे भारत छोडो आंदोलन या साऱ्यात महात्माजींचे नेतृत्व झळाळून उठले.

जगाच्या इतिहासात ज्या महामानवाचा उल्लेख केला जातो त्यामध्ये महात्मा गांधीजीचे नाव आवर्जून घेतले जाते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात जे अनेक लहान मोठे नेते होऊन गेले त्या सर्वांच्या तुलनेत महात्मा गांधीचे व्यक्तिमत्व विविध पैलूनी वैशिष्ट्यपूर्ण होते. इ.स. 1920 नंतर भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील एक नवे पर्व सुरू झाले होते. ते सत्याग्रहाच्या नावाने ओळखले जाते. महात्मा गांधी हे केवळ भारताच्या नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक अनोखे व्यक्तिमत्व होते. साम्राज्यवादी शक्ती विरुद्ध सुरू असलेल्या स्वातंत्र्य लढ्यात सत्याग्रहाचे नवीनच तंत्र वापरणारे महात्मा गांधी विख्यात झाले होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात इ.स. 1919 ते 1948 हा कालखंड गांधीयुग म्हणून समजला जातो. कारण या कालखंडात काँग्रेसचे सर्वेसर्वा सूत्रधार गांधी हेच होते. लोक त्यांना आदराने बापू म्हणत असत आज सबंध जगामध्ये त्यांना राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाते. त्यांची ही ओळख त्यांच्या कार्यामुळेच झालेली आपणास दिसून येते. गांधीजींनी शांततेचा संदेश संपूर्ण जगाला दिला त्यामुळे संपूर्ण मानव जात प्रभावित झालेली आपणास दिसून येते. महात्मा गांधीजीच्या राजकीय विचारांमध्ये सत्याग्रहाला सर्वश्रेष्ठ स्थान होते. महात्मा गांधीजीचे राजकीय सामाजिक व आर्थिक तत्वज्ञान नैतिकतेवर आधारित होते. सत्याग्रह या शब्दाचा अर्थ सत्याचा आग्रह असा होता. गांधीजींची सत्यावर श्रद्धा असून सत्याच्या प्राप्तीसाठी त्यांनी अहिंसा या तत्त्वाचा वापर करण्यास सांगितले. गांधीजींनी सत्याग्रहाच्या कल्पनेत अहिंसा या तत्त्वावरच अधिक भर दिला होता. असहकार, सविनय कायदेभंग, हरताळ, उपोषण व बहिष्कार ही महात्मा गांधीच्या सत्याग्रहाची अर्थात प्रतिकाराची साधने होती. महात्मा गांधीच्या असहकार चळवळीमुळे देशातील परिस्थिती ढवळून निघाली होती. सामान्यातील सामान्य जनतेला या चळवळीचे महत्त्व पटलेले होते. चौवरी चौरा येथील घटनेने या चळवळीला हिंसक वळण लागताच तत्त्वनिष्ठ गांधीजींनी ही चळवळ थांबवली. यावेळी अनेकांनी महात्मा गांधीजींना नाव ठेवले होते. परंतु त्याची पर्वा त्यांनी केले नाही. लोकांच्या नजरेतून महात्मा गांधी उतरलेले दिसताच सरकारने त्यांना अटक केली. याचवेळी भारतातील राजकीय चळवळ थंड होऊ नये यासाठी पंडित नेहरू व देशबंधू चित्तरंजनदास यांनी स्वराज्य पक्षाची निर्मीती करून स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य केले. मात्र कायदेमंडळात प्रवेश करून तेथे सरकारविरुद्ध फारसे काही करता न आल्याने स्वराज्य पक्षाबद्दलचे आकर्षण जनतेमधून कमी होऊ लागले. एकूणच वातावरण थंड झाले. महात्मा गांधी तुरुंगातून सुटल्यावर इ.स. सन 1924 पासून हिंदू आणि मुसलमान यांच्यातील एकोपा कसा वाढेल या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. त्यातच अशा या थंड वातावरणाचे स्वरूप बदलले ते सायमन कमिशनच्या नियुक्तीमुळे इ.स. सन 1930 ते 1931 हे वर्ष आधुनिक भारताच्या इतिहासात वैशिष्ट्यपूर्ण समजले जाते. असहकार चळवळी नंतर भारतात यावेळी दुसऱ्या व्यापक राष्ट्रीय आंदोलनास प्रारंभ झाला होता. महात्मा गांधीजीच्या जीवनातील हा दुसरा सविनय कायदेभंगाचा व्यापक लढा सुरू होता. हा लढा कधी सुरू करावयाचा याचा निर्णय महात्मा गांधीजींनी घ्यावयाचा होता. त्यानुसार 1930 च्या प्रारंभी महात्मा गांधीजींनी मिठाचा कायदा मोडून सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला. यावेळी अनेकांना आश्चर्य वाटले पण काँग्रेस श्रेष्ठींनी याचे महत्त्व ओळखले होते. कारण हा कायदा सर्व तळागाळातील जनतेला स्पर्श करून जाणारा होता. मीठ हे प्रत्येकाला लागणारी वस्तू आहे या वस्तूवर सरकारने कर लावणे हा भारतीय जनतेवर मोठा अन्याय आहे याची जाणीव या निर्णयाने सामान्यातील सामान्य माणसाला करून देण्याचा गांधीजींचा माणस होता.

### दांडी यात्रेची तयारी

सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा सर्व तपशील महात्मा गांधीजींनी आपल्या सहकाऱ्यांकडे मांडला होता. 12 मार्च 1930 रोजी आपल्या निवडक 78 सहकार्यासह साबरमती आश्रमातून निघून गुजरातच्या समुद्रकिनारी वसलेल्या दांडी या गावी 241 मैलाचे अंतर पायी चालत जावयाचे तेथे गेल्यानंतर सर्वांनी मिठाचा फायदा मोडायचा व त्यानंतर देशात सर्वच ठिकाणी कायदेभंगाची चळवळ सुरू करावयाची होती. दांडी यात्रेची अभिनव कल्पना अभिनव योजना होती. दांडी यात्रेतील सर्व सहकारी गांधीजींनी निवडून घेतले होते. यामध्ये निवडलेले जे सहकारी होते ते निरनिराळ्या

प्रांताचे, धर्माचे, जातीचे प्रतिनिधित्व करणारे होते. महिलांच्या आग्रहाखातर महात्मा गांधीजींनी महिलांना देखील प्रतिनिधित्व देण्याची मान्य केले. सरोजिनी नायडूंचा सहभाग गांधीजींनी आपल्या सहकाऱ्यांमध्ये केला. या यात्रेच्या तयारीने आश्रमात नवचैतन्याचे वारे वाहू लागले होते. महात्मा गांधीच्या या लढ्याकडे देशाचेच नव्हे तर साऱ्या जगाचे लक्ष वेधले गेले होते. अनेक परदेशी पत्रकार गांधीजींची मुलाखत घेण्याकरिता आशीर्वाद येऊ लागले गांधीजीच्या सायंकाळच्या प्रार्थनेत हजारो लोक मोठ्या संख्येने उपस्थित राहू लागले. महात्मा गांधीजीच्या या चळवळीला देशातील 50 हजार लोकांनी आश्रमात येऊन समर्थन केले. साबरमती आश्रम सोडण्यापूर्वी सायंकाळच्या सभेत गांधीजी म्हणतात आपले साबरमती आश्रमातील हे अखेरचे भाषण आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच आपण येथे परत पाऊल टाकू मात्र मध्येच आपल्याला अटक झाली तरी जनतेने उत्साहाने ही चळवळ चालू ठेवावी.

**दांडी यात्रा**

12 मार्च रोजी सकाळी प्रत्यक्ष दांडी यात्रेस सुरुवात झाली. हातात काठी घेतलेले गुडघ्यापर्यंत खादीचे वस्त्र नेसलेले 62 वर्षाचे गांधीजी तरुणांनाही लाजविणाऱ्या उत्साहाने आपल्या निवडक 78 सहकार्यासह दांडी यात्रेसाठी निघाले. दररोज दहा-बारा मैलाचे अंतर कापल्यानंतर जे गाव असेल तेथे मुक्काम करायचे सायंकाळी गावकऱ्यांना या सत्याग्रहाचे महत्त्व समजावून सांगायचे परत सकाळी उठून पुढचा प्रवास चालू करत असत. असे जात असताना त्यांच्या या प्रवासात अनेक लोक सामील झाले होते. त्यांच्यासोबत काही परदेशी पत्रकारही होते गांधीजींना मिळत असलेला प्रतिसाद पाहून ते आश्चर्यचकित होत होते. या अभिनव प्रयोगाची देशात देशाबाहेर प्रसिद्धी होत होती. साबरमती ते दांडी हे अंतर्गत 241 महिलाचे होते ते 24 दिवसात पूर्ण करण्याचे काम महात्मा गांधीजींनी केले. 5 एप्रिल रोजी गांधीजी आपल्या सहकार्यासह दांडीला पोहोचले. दुसऱ्या दिवशी गांधीजी समुद्रकाठी जाऊन स्वतः मीठ उचलणार होते. सरकारच्या दृष्टीने मीठ उचलणे गुन्हा होता. त्यापूर्वी म.गांधीजींना अटक झाली तर त्या सत्याग्रहाचे नेतृत्व अब्बास तय्यबजी व त्यांच्या पश्चात सरोजिनी नायडू यांनी करावे असे ठरले. 6 एप्रिल रोजी गांधीजी सहकार्यासह सकाळी समुद्रात उतरले व किनारपट्टीवरील मीठ उचलून त्यांनी कायदेभंग केला. या क्रांती नंतर देशभर कायदेभंगाला सुरुवात झाली. 5 हजार गावातून मिठाचा कायदा मोडण्यात आला. गांधीजीचा जनमानसावरचा प्रभाव लक्षात घेऊन सरकारने दांडी येथे त्यांना अटक केली नाही परंतु चळवळ मोडण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभाई पटेल अशा अनेक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आले. सभा मिरवणुकावर बंदी घालण्यात आली. त्यानंतर सुरत जिल्ह्यातील धारासना येथे जाऊन कायदेभंग करण्याचा आपला मनोदय 1 मे रोजी गांधीजींनी लॉर्ड आयर्विन यांना कळविला तेव्हा मात्र त्यांना लागलीच अटक करण्यात आली. परंतु ठरल्याप्रमाणे नियोजित सत्याग्रहाचा विचार थांबला नाही. ही चळवळ थांबेल असे सरकारला वाटले होते. परंतु हीच सरकारची अशा फोल्ड ठरली. उलट याचा प्रतिकार म्हणून ठीक ठिकाणी सभा बहिष्कार हरताळ खूप मोठ्या प्रमाणात होऊ लागले. गांधीजींना झालेल्या अटकेचे परिणाम देशात व देशाबाहेर झाले. शंभर अमेरिकन धर्मगुरूंनी ब्रिटिश पंतप्रधानांना पत्र पाठवून काँग्रेसची तडजोड करण्याची विनंती केली. भारताविषयी सहानुभूती असलेले ख्यातनाम तत्त्वचिंतक रोमा रोला यांनी भारताच्या वतीने युरोपात प्रचार सुरू केला.

**धारासना सत्याग्रह**

ठरल्याप्रमाणे महात्मा गांधीच्या अटकेनंतर धारासना मीठा घरापुढे सत्याग्रह करण्याची तयारी यांनी केली. तेव्हा सरकारने त्यांना अटक केली त्यावेळी सत्याग्रहाची सूत्रे सरोजिनी नायडू यांनी आपल्या हाती घेतली. अडीच हजाराहून अधिक स्वयंसेवकांनी यात सहभाग घेतला होता. सत्याग्रहात अडथळा निर्माण करण्याकरिता धारासनाकडे जाणारे सर्व मार्ग सरकारने अडविले तरीही सत्याग्रहाच्या दिवसापर्यंत 3000 लोक आले होते. हा सत्याग्रह पाहण्यासाठी अमेरिकन वार्ताहर वेब मिलरहे हे देखील उपस्थित होते. सत्याग्रहाच्या पहिल्या दिवशी सरोजिनी नायडू यांनी सत्याग्रहांना उद्देशून भाषणे केले त्या म्हणाल्या आपल्यावर सरकारने लाठी हल्ला केला तरी प्रतिकारासाठी हात उचलू नये सत्याग्रहींनी एकत्र न जाता लहान लहान तुकड्या कराव्यात व एक एक तुकडी पुढे जावे असे आवाहन सरोजिनी नायडू यांनी केले. याप्रमाणे 22 मे रोजी पहिली तुकडी मिठागराजवळ पोहोचतात त्यांना मागे फिरण्याचे आदेश देण्यात आले. त्याकडे सत्याग्रहीने दुर्लक्ष केले व पुढे चालत राहिले तेव्हा लाठिदारी पोलीस त्यांच्यावर तुटून पडले. यात रक्तबंबाळ झालेले सत्याग्रही खाली पडत होते. पण प्रतिकारासाठी त्यांनी हात उचलला नाही. त्याच अवस्थेत ते पुढे चालत होते. पहिल्या तुकडीतील सर्व सत्याग्रही पडल्यानंतर दुसरी तुकडी पुढे आली असाच प्रसंग यांच्यावरही आला. तेव्हा तिसरी तुकडी पुढे सरसावली असा प्रकार दुपारी एक पर्यंत चालत होता. आजूबाजूचे लोक हा प्रकार पाहून थक्क झाले होते. या सत्याग्रहाचे साक्षीदार असलेले मिलर लिहितात 18 वर्षाच्या माझ्या पत्रकारितेच्या काळात 22 देशातील जनआंदोलने मी पाहिले परंतु धारासनासारखी घटना कधी पाहिली नाही. शेवटी दुपारी एकच्या दरम्यान सत्याग्रही मिठागाराजवळ पोहोचलेच. त्यावेळी सरोजिनी नायडू, आली इमाम आणि मनीलाल गांधी यांना अटक करण्यात आले. सत्याग्रह संपल्यानंतर घायाळ झालेल्या सत्याग्रहीना वेदकीय सेवेची आवश्यकता होती पण सरकारने ती केली नव्हती. धारासना येथे सत्याग्रहींनी ज्या झुंजार वृत्तीने सत्याग्रह केला तीच परिस्थिती इतरत्र दिसून आली. वेगवेगळया प्रांतात वेगवेगळया पद्धतीने कायदे तोडण्यात आले होते. सत्याग्रहाचे लोन खेड्यापाड्यापर्यंत पसरले होते. दांडी येथील मिठाच्या सत्याग्रहापूर्वीच ओरिसात उत्पादित होणाऱ्या मिठावर ब्रिटिशांनी बसवलेल्या करामुळे तिथे 1929 सालापासून आंदोलन सुरूच होते. तिथे मीठ तयार करण्यावर बंदी घालण्यात आल्यामुळे वातावरण तापलेले होते. गांधीजी दांडीला पोचण्यापूर्वीच ओरिसामधील लोकांनी मिठाचे उत्पादन सुरू ठेवण्याचा निर्धार केला. कटक येथे ओरिसाच्या वेगवेगळया भागातून स्वयंसेवक जमा झाले. मिठाच्या सत्याग्रहाबद्दल जाहीर सभा घेण्यात आल्या. या सभेत भाषणे करणाऱ्यांना ब्रिटिश सरकारने अटक करून तुरुंगात टाकले. 6 एप्रिलला गोपबंधू चौधरी आणि आचार्य हरिहर दास यांच्या नेतृत्वाखाली 21 सत्याग्रहींच्या तुकडीने स्वराज आश्रम, कटक येथून इंचुरी येथे मिठाच्या सत्याग्रह करण्यासाठी पायी जाण्यास सुरुवात केली. 9 एप्रिलला चांडोल येथे गोपबंधू चौधरी यांना अटक झाली. तरी यात्रा सुरूच राहिली. 13 एप्रिलला इंचुरी येथे पोचलेल्या हजारो सत्याग्रहींनी मूठभर मीठ हातात घेऊन कायदेभंग केला. सत्याग्रहींच्या तुकड्या मीठ हातात घेऊन कायदा मोडत. पोलीस त्यांना अटक करत. मग सत्याग्रहींची पुढची तुकडी पुढे येत असे. सर्व तुरुंग भरून गेले तरी आंदोलनात नवीन लोक सहभागी होतच होते. इंचुरीमधील सत्याग्रहात महिलांची संख्या लक्षणीय होती. काही निदर्शने महिलांनी आयोजित केली होती. शेवटी सर्व सत्याग्रहींची तुरुंगातून सुटका झाली, तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी हजारो लोक जमले होते.मिठाच्या सत्याग्रहाने स्वातंत्र्य लढ्याला मोठे बळ मिळाले.जग बदलणाऱ्या 10 महत्त्वपूर्णआंदोलनात या सत्याग्रहाचा समावेश टाईम नियतकालिकाने केला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. कठारे अनिल, भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास,प्रशांत पब्लिकेशन जळगाव, जानेवारी 2013

२. डॉ. वैद्य सुमन व डॉक्टर कोटेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, (1757 ते 1857), श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

३. डॉ. ग्रोवर बी एल व डॉ. एन के, आधुनिक भारताचा इतिहास, एस आणि कंपनी दिल्ली

४. डॉ. कोटेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, (1947 ते 2000), श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

५. डॉ. कठारे अनिल, आधुनिक भारताचा इतिहास, (इ.स. 1600 ते इसवी सन 1986), कल्पना प्रकाशन नांदेड